महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक
द्वारा आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक
दुरध्वनी क्रमांक २५७५६१५, २३१७९३८ फॅक्स क्रमांक २५७९२०८

क.प.स्कुल-२०२२/प्र.क्र.५७(D)/का.६(७)/ 3509 दिनांक:-२४/०६/२०२२

प्रति,
१) अपर आयुक्त
आदिवासी विकास विभाग,
नाशिक/नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नवीन ६ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करणेबाबत

संदर्भ:- नेस्ट नवी दिल्ली यांचे पत्र F No.NESTS/HR/EMRS/२०१/२०२१-२२ दिनांक.०८.०६.२०२२

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये नव्याने ६ शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्या शाळांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | नव्याने सुरु करावयाच्या शाळेचे नाव |
|---|---|
| १ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,शहादा ( मोहीदा) |
| २ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,तळोदा (खरवड) |
| ३ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,पेठ (देवगाव) |
| ४ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,बोरीपाडा |
| ५ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,साक्री |
| ६ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल,धानोरा |

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून ६ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करावयाचे असून इ.६ वी च्या वर्गामध्ये ६० विद्यार्थी (३० मुले,३० मुली )प्रवेशित होणार आहेत. त्यानंतरच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी संख्येत ६० ने वाढ होणार आहेत या बाबी विचारात घेवून आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या शासकिय आश्रमशाळेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करावयाचे आहे. त्या ठिकाणी पुढील प्रमाणे उल्लेख केलेल्या भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता आपले स्तरावरुन लेखी आदेश निर्गमित करावेत.

उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधांचा तपशिल.

अ) भौतिक सोयी सुविधा

१. एकलव्य शाळेसाठी स्वतंत्र वर्ग खोल्यांची व्यवस्था.
२. एकलव्य शाळेतील मुलांची निवास व्यवस्था.
३. एकलव्य शाळेतील मुलींची निवास व्यवस्था.
४. एकलव्य शाळेतील विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था
५. एकलव्य शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या इतर आवश्यक सोयी सुविधा

आपल्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरू करण्याकरिता माहे जुलै २०२२ अखेर पर्यंत लेखी आदेश निर्गमित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदस्य सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी.
तथा आयुक्त, आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र राज्य नाशिक

प्रतिलिपी - मा.अध्यक्ष, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी, नाशिक तथा मा.सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२

कार्यवाहीस्तव- प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र.- गडचिरोली/ धुळे/ नंदूरबार / तळोदा /नाशिक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नवीन एकलव्य शाळेकरिता सर्व सोयी सुविधांची उपलब्धता करून देण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्र शासन
कार्यालय
फोन.०७१३२-२२२२८६
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली
L.I.C ऑफीस जवळ,कॉम्प्लेक्स गडचिरोल
email:- poitdp.gchiroli-mh@gov.in

क्र. शिक्षण-२०२१/प्रक्र / का.४(अ) /१६०२/ २०२२ दिनांक :२६ / ०९/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक
शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सावरगांव

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल सुरु करणेबाबत.

संदर्भ :-१. मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे पत्र क्र. प.स्कूल-२०२२/प्र.क्र.५७(D)/ का.६(७)/३५०९ दिनांक २४/०६/२०२२

२. मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचे पत्र क्र. /एकलव्य २०२१/प्र.क्र.७०१/ का.३(२)/३३८५ दि. ०१/०७/२०२२

उपरोक्त, संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुल, धानोरा ही नविन एकलव्य निवासी शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर एकलव्य सेसिडेंशियल स्कुल तातपुरत्या स्वरुपात शासकीय आश्रमशाळा, सावरगाव येथे सुरु करावयाची आहे.

तेव्हा शैक्षणिक सत्र २०२२-२३ करीता उक्त एकलव्य शाळा धानोरा स्थित शासकीय आश्रमशाळा, सावरगांव ता. धानोरा येथे इयत्ता ६ वी च्या वर्गामध्ये ६० विद्यार्थी (३० मुले, ३० मुली) प्रवेशित होणार आहेत. त्यानंतरच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी संख्येत ६० ने वाढ होणार आहेत. या बाबी विचारात घेवुन एकलव्य शाळा सुरु करावयाची आहे.

१. त्या शाळेसाठी संपुर्ण भौतिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. (या कार्यालयाचे पत्र क्र.शिक्षण-९४०/२०२२दि.०१/०७/२०२२ नुसार)
२. आवश्यक मनुष्यबळ कार्यालयाकडून पुरविण्यात येईल.
३. एकलव्य रेसिडेंशियल स्कुल धानोराचे बँक खाते तात्काळ उघडण्याची कार्यवाही करावी. व या बाबतचा अहवाल कार्यालयास कळविण्यात यावा.

(डॉ. मैनक घोष, भाप्रसे,)
सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
गडचिरोली

प्रतिलिपी :- १. मा. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
गडचिरोली

महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी नाशिक
द्वारा आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन, पहिला मजला,गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक
दुरध्वनी क्रमांक २५७५६१५, २३१७९०३ फॅक्स क्रमांक २५७९२०८

महाराष्ट्र शासन

क्र.प.स्कुल-२०२०/प्र.क्र.१०१ /का.६(७) / ३०९ दिनांक: २७/०६/२०२१

कार्यालय प्रकल्प अधिकारी
एक. आ. वि. प्र. गडचिरोली
शाखा -
आवक क्र. - 1294
आवक दि. - 11-8-021
वर्क शिट नोंद क्र. - 496
का.अ. / स.प्र.अ. / मा.प्र.अ.

प्रति,
१) अपर आयुक्त
आदिवासी विकास विभाग,
नाशिक/ठाणे/नागपुर/अमरावती

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये नवीन १४ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करणेबाबत

संदर्भ:- १.MOTA,GOI (EMRS Div.) याचें पत्र दिनांक.२१/०१/२०२०
२.MOTA,GOI (EMRS Div.) याचें पत्र दिनांक.११/०३/ २०२०
३. MOTA,GOI (EMRS Div.) याचें पत्र दिनांक.२८/०७/२०२०
४. MOTA,GOI (EMRS Div.) याचें पत्र दिनांक.३१/०७/२०२०
५. महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेच्या दिनांक.२७/०१/२०२१ च्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीतील निर्णय
६.MOTA letter D.O.११०१५/०२/२०१९-Grants Dated.०१/०४/२०२१
७. MOTA,GOI (EMRS Div. ) याचें पत्र दिनांक.१६/०६/२०२१

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राज्यात१४ नवीन एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करणे प्रस्तावित आहे.संबधित अपर आयुक्त कार्यालयाने कळविल्यानूसार नवीन १४ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल साठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरु असून कायम-स्वरूपी इमारत प्राप्त होईपर्यंत सदरील शाळा तात्पुरत्या स्वरूपात संबधित तालुक्यातील सर्व सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या ज्या शासकिय आश्रमशाळांमध्ये सुरु करावयाच्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ. क्र | प्रस्तावित एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूलचे नाव | मंजूरीचे वर्ष | तात्पुरत्या स्वरुपात एकलव्य शाळा सुरु करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, कोरची ता.कोरची जि.गडचिरोली | सन २०२०-२१ | शासकीय आश्रमशाळा कोरची ता.कोरची,जि.गडचिरोली |
| २ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, धानोरा,ता.धानोरा जि.गडचिरोली | सन २०२०-२१ | शासकीय आश्रमशाळा सावरगाव,ता.धानोरा जि.गडचिरोली |
| ३ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, भामरागड,ता.भामरागड जि.गडचिरोली | सन २०२०-२१ | शासकीय आश्रमशाळा ताडगाव ता.भामरागड जि.गडचिरोली |
| ४ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, शहादा ता.शहादा, जि नंदूरबार | सन २०२०-२१ | शासकीय आश्रमशाळा सुलतानपूर ता.शहादा जि.नंदूरबार |
| ५ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, डहाणू ता.डहाणू जि पालघर | सन २०२०-२१ | शासकीय आश्रमशाळा चळणी ता.डहाणू जि.पालघर |
| ६ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, धारणी, ता.धारणी जि अमरावती | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा वाई खु. ता.वरूड,जि.अमरावती |
| ७ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, साक्री,ता.साक्री जि धुळे | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा पांगण ता.साक्री जि.धुळे |
| ८ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, तळोदा, ता.तळोदा जि नंदूरबार | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा बोरद,ता.तळोदा जि.नंदूरबार |
| ९ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, एटापल्ली,ता.एटापल्ली जि गडचिरोली | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा कसनसूर ता.एटापल्ली,जि.गडचिरोली |
| १० | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, पेठ, ता.पेठ जि नाशिक | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा इनामबारी ता.पेठ जि.नाशिक |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, त्र्यंबकेश्वर,ता. त्र्यंबकेश्वर जि.नाशिक | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा भिलमाळ ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक |
| १२ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, विक्रमगड,ता.विक्रमगड जि पालघर | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा कुर्झे ता.विक्रमगड जि.पालघर |
| १३ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, मोखाडा, ता.मोखाडा जि पालघर | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा हिरवे ता.मोखाडा जि.पालघर |
| १४ | एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल, वाडा ता.वाडा जि पालघर,पालघर | सन २०२१-२२ मध्ये प्रस्तावित | शासकीय आश्रमशाळा पाली ता.वाडा जि.पालघर |

उपरोक्त प्रमाणे सर्व शासकिय आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरू करावयाचे असून इ.६ वी च्या वर्गामध्ये ६० विद्यार्थी (३० मुले,३० मुली )प्रवेशित होणार आहेत. त्यानंतरच्या प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी संख्येत ६० ने वाढ होणार आहेत या बाबी विचारात घेवून आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या शासकिय आश्रमशाळेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरू करावयाचे आहे त्या ठिकाणी पुढील प्रमाणे उल्लेख केलेल्या भौतिक सोयी सुविधा आणि आवश्यक मनुष्यबळ (शिक्षक/शिक्षकेत्तर ) उपलब्ध करून देण्याकरिता आपले स्तरावरून लेखी आदेश निर्गमित करावेत.

उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधांचा तपशिल.

अ) भौतिक सोयी सुविधा

१. एकलव्य शाळेसाठी स्वतंत्र वर्ग खोल्यांची व्यवस्था.
२. एकलव्य शाळेतील मुलांची निवास व्यवस्था.
३. एकलव्य शाळेतील मुलीची निवास व्यवस्था.
४. एकलव्य शाळेतील विद्यार्थ्यांची भोजन व्यवस्था
५. एकलव्य शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या इतर आवश्यक सोयी सुविधा

ब) मनुष्यबळ सुविधा

१. प्रभारी प्राचार्य
२. टी.जी.टी.( भाषा )
३. टी.जी.टी.( गणित / विज्ञान )
४. अधिक्षक - पुरूष
५. अधिक्षक - स्त्री
६. लिपीक

वरिलप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरू करण्याकरिता माहे जुलै २०२१ अखेर पर्यंत लेखी आदेश निर्गमित करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदस्य सचिव,
महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी,
तथा आयुक्त, आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र राज्य नाशिक

प्रतिलिपी - मा.अध्यक्ष, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी, नाशिक तथा मा.सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२

कार्यवाहीस्तव- प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र.- गडचिरोली/ भामरागड/ धुळे/ नंदूरबार /डहाणू/ धारणी/ तळोदा /नाशिक/जव्हार यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नवीन एकलव्य शाळेकरिता सर्व सोयी सुविधांची उपलब्धता करून देण्याची दक्षता घ्यावी.